MHKO100002662022

# आदेश निशाणी क्र. १८

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा कायम मनाई तारकीदीकरीता दाखल केलेला आहे. सदरचा दावा प्रलंबित असताना दिनांक ०८/०७/२०२२ रोजी वादी क्र. १ अजित रामचंद्र मुजुमदार हे मयत झालेले आहेत. त्यांचे नाव सदर दाव्यातून वादी क्र. १ म्हणून असून सदरचे नाव दाव्यातून वगळणे अत्यंत आवश्यक आहे. सबब अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे सादर केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जातील मजकुर खोटा असलेने नामंजूर करणेत यावा. सदर मयत वादी यांना मुले वारस आहेत. त्यांना रेकॉर्डवर न आणता वगळणेसाठीचा दिलेला अर्ज लबाडीने दिलेला असलेने नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. दावा मिळकत १अ ही प्रतिवादी क्र. ३

यांचेकडून दिनांक १५/०६/१९९१ रोजी नोंदणीकृत दस्त क्र. १२५२ प्रमाणे वादी क्र. १ ते ४ यांनी समाईकात खरेदी केल्याचे दिसते. त्यामुळे वादी क्र. १ चा हक्क व सहभाग दावा मिळकतीमध्ये दिसून येतो. वादी यांनी आपल्या अर्जामध्ये वादी क्र. १ ची मुले परगावी राहणेस असलेने प्रस्तुतचे कामी हजर राहणे अशक्य आहे असे कळविले आहे. दावा स्थावर मिळकतीबाबत असलेने वादी क्र. १ चे वारस दाव्यात सामील असणे गरजेचे आहे. त्यामुळे वादी क्र. १ चे वारस परगावी राहत असलेने दाव्याचे कामी हजर राहणे अशक्य आहे हे कारण संयुक्तीक वाटत नाही. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज कोणत्या कलकामाखाली दिला हे अर्जात नमुद नाही. केवळ मोघम स्वरुपात कारण नमूद करुन अर्ज दाखल केलेचे दिसून येते. सबब सदरचा अर्ज नामंजूर करणे उचित होणार आहे. म्हणून, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. या अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ठ करण्यात येतो.

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक – २७/०७/२०२३

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज